# अमरावती महानगरपालिका अमरावती

## महिला व बाल विकास विभाग

**कोटेशन नोटीस**

जा क्र- अमनपा/मबावि/ 208 / 2025 दिनांक - 3 /12/2025

महिला व बालविकास विभाग, महानगरपालिका अमरावती अंतर्गत खालील प्रमाणे कार्य करावयाचे आहे. तरी ज्यांना काम करावयाचे असेल त्यांनी आपआपले सीलबंद कोटेशन महिला व बालविकास अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक 09 / 12 /2025 रोजी दुपारी 12 वाजेपर्यंत आणुन द्यावे. मुदतीनंतर आलेले दरपत्रक स्वीकारण्यात येणार नाही.

| योजना | कामाचे नाव | दर |
|---|---|---|
| 1 | महिला व बालविकास विभाग अंतर्गत महिला / युवतींना स्वयंरोजगार करीता शिलाई मशीनचा पुरवठा करणे. | प्रती नग सर्व कर व खर्चासह दर सादर करावे . |

**दरपत्रकासोबत जोडावयाचे आवश्यक कागदपत्र :-**

**(B-1) – लिफाफा क्र.01**

1. GST नोंदणी प्रमाणपत्र
2. महाराष्ट्र दुकाने व संस्था अधिनीयम नुसार नोंदणी प्रमाणपत्र (शॉप ॲक्ट लायसन्स
3. कंपनीचे अधिकत पुरवठादार / वितरक असल्याचे प्रमाणपत्र
4. व्यवसाय कर प्रमाणपत्र.
5. पॅनकार्ड
6. शिलाई मशीन कंपनीचे ISO प्रमाणपत्र
7. कोणत्याही शासकीय कार्यालयाकडुन काळया यादीत नसल्याचे व जोडलेली कागदपत्रे खोटी व असत्य नसल्याचे 100/- रु स्टॅम्प पेपरवर शपथपत्र.
8. पुरवठा करणार असलेले शिलाई मशीन (मॉडल) भारतीय मानक ब्युरो (ISI मार्क) यांचे विधीग्राहय प्रमाणपत्र ( किमान IS १६१०:२०००) प्रमाणपत्र
9. शासकीय कामाचा अनुभव असल्याचे / काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र (असल्यास प्राधाण्य )

**( B-2 ) – लिफाफा क्र.02** ( प्रती मशीन सर्व कर व खर्चासह दरपत्रक )

## अटी व शर्ती -

1. लखोटा क्र.१ मधे वरील प्रमाणे कागदपत्रे असल्याशिवाय लखोटा क्र.२ उघडण्यात येणार नाही.
2. महानगरपालिका, महिला बालकल्याण करीता राखीव ५ टक्के स्वनिधी अंतर्गत सदर खरेदी प्रक्रिया
3. करण्यात येत आहे.

4. शिलाई मशीनचे दर सर्व करांसह व दरासह व फिटींग व वाहतुक खर्चासह द्यावेत. महानगरपालिका त्याव्यतीरीक्त कोणतेहीकर खर्च वा अग्रीम देणार नाही.

5. पुरवठा करण्यात येणारी शिलाई मशीन कार्यालयाकडुन प्राप्त आदेशानुसार व मागणी केलेल्या संख्येत फिर्टींग करुन पुरवठादाराने पुरवठा करावी लागेल .

6. पुरवठा आदेश मिळाल्यापासुन ३० दिवसाचे आत साहीत्य पुरवावे लागेल.

7. पुरवठा केलेल्या शिलाई मशीन सुस्थितीत असाव्यात तसे न आढळल्यास पुरवठादारास स्वखर्चाने साहित्य परत न्यावे लागेल. त्याबाबतची कोणतीही तक्रार/जबाबदारी विचारात येणार नाही. तसेच पुरवठा केल्यापासुन पुढिल एक वर्षापर्यंत साहित्य तुटफुट व कोणतेही अडचण आल्यास मेंटनन्स पुरवठादारास विनामुल्य करुन द्यावे लागेल.

8. दरपत्रक मंजुर झाल्यास नियमानुसार लागु असलेल्या रकमेच्या स्टॅम्प पेपर वर पुरवठारास कार्यालयात हजर राहुन करारनामा करुन द्यावा लागेल. व नियमानुसार सुरक्षा रक्कम जमा करावी लागेल.

9. निवीदा धारकाने दिलेले दर (करारनामा / दरकरारानुसार अंतीम) हे एक वर्ष कालावधीपर्यंत अस्तीत्वात राहील व मनपा मागणी करेल तशा परीस्थितीत व संख्येत साहीत्य पुरविने पुरवठादारास बंधनकारक राहील.

10. तांत्रीक वा वाणिज्यीक लिफाफा उघडण्यापूर्वी किंवा छाननीच्या कोणत्याही टप्यात आवश्यकता वाटल्यास सॅम्पल पाहणी करुन साहित्य निवडीचा अधिकार निवीदा / साहित्य खरेदी समितीस राहणार असुन त्याबाबत निर्णय दरपत्रकधारकास बंधनकारक राहिल.

11. साहित्य पुरवठा केल्यानंतर देयक अदा होण्यास विलंब झाल्यास महानगरपालिका त्यावर व्याज देणार नाही वा पुरवठादाराची विनंती विचारात घेतल्या जाणार नाहि.

12. सदरचा शिलाई मशीन पुरविण्याचा कंत्राट हा अहस्तांतरणीय असेल. कंत्राटदारास हा कंत्राट मदतपूर्व सोडता येणार नाहि. सोडल्यास नुकसान भरपाई सुरक्षा रकमेतून वसुल करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना राहिल. अशा परीस्थीत दुसरा कंत्राटदार नियुक्त करण्यात येईल व बाळावर कंत्राटदारास हरकत घेता येणार नाही

13. निवीदेवावत काही अडचणी असल्यास महिला व बालविकास विभाग येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा सपक साधावा.

14. एक अथवा त्यापेक्षा जास्त दरपत्रक स्विकारण्याचा, अथवा कोणतेही कारण न देता निवीदा नाकारण्याचा अथवा कोणत्याही टप्यात संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांचे कडे अथवा प्राधीकृत अधिकारी यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.

15. निवीदाधारकाने निवीदा भरतेवेळी दिलेली माहिती वा कागदपत्रे खोटी / असत्य आढळुन आल्यास कोणत्याही टप्यात संबंधीतांची निवीदा नामंजुर करुन आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

16. अटी असलेले दरपत्रक अमान्य राहतील.

17. निवीदा बाबत काही वाद निर्माण झाल्यास न्यायालयीन मर्यादा अमरावती शहर राहील.

18. वरील अटी / शर्ती व्यतीरीक्त अन्य अही लागु करण्याचे सर्वाधिकार मा. आयूक्त अथवा प्राधीकृत अधिकारी यांना राहिल.

19. शक्य झाल्यास प्राप्त कोटेशन दिनांक 09 /12 /2025 रोजी उघडण्यात येईल.

20. अधिक माहिती तसेच सविस्तर अटी / शर्तीकरीता महिला व बालविकास विभाग येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

दिनांक :-3 /12/2025

महिला व बालविकास अधिकारी
महानगरपालिका अमरावती

उपायुक्त (02)
महानगरपालिका अमरावती